# महात्मा गांधीजींच्या विचारांची वर्तमान काळातील उपयुक्तता

**डॉ.पंजाब चव्हाण**
*प्राचार्य, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,*
*भोकर, जि.नांदेड*

**प्रास्तविक-**

महात्मा गांधी हे आधुनिक भारतातील एक युगप्रवर्तक नेते होते. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताला महत्व मिळवून देणाऱ्या ज्या व्यक्ती भारतात जन्माला आल्या त्यात महात्मा गांधींचे स्थान महत्वाचे आहे. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. भारतीय इतिहासातील इ.स.१९२० ते १९४७ पर्यंतचा कालखंड हा गांधीयुग म्हणून ओळखला जातो. या काळात त्यांनी मांडलेला विचार गांधीवाद म्हणून जगप्रसिध्द आहे आणि तो आज २१ व्या शतकात जीवनाचा युगधर्म बनला आहे. हा राजकीय सिध्दांत नसून जीवन जगण्यासाठी दिलेला संदेश आहे. वैचारिकदृष्ट्या स्वतंत्र मांडणी करणारा व सामाजिक विषमतेचा प्रतिकार करणारा तरीही विचाराने कर्मठ असणारा विचारवंत म्हणून गांधीकडे पाहिले जाते. जॉन रस्कीनच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता याबरोबरच त्यांच्या विचारात येशू ख्रिस्त, भगवान महावीर आणि अंहिंसक मार्गाने सत्याचा कास धरतांना बुध्दांची करूणा दिसते. भारतात म.गांधीजींचे कार्य महत्वाचे आहे, कारण त्यांनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व करून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे महान कार्य केले. सत्य, अंहिसा, व सत्याग्रह या मूल्यांची व विचारांची देणगी संपूर्ण मानवजातीस दिली. म्हणून त्यांच्या या सर्व विचारांची २१ व्या शतकात सुध्दा उपयुक्तता लक्षात येते. महात्मा गांधीजींच्या विचारांचा अभ्यास व्हावा या दृष्टीकोनातून हा संशोधन पेपर लिहण्याचा प्रयत्न केला आहे.

**महात्मा गांधीजींचे विचार -**

महात्मा गांधीनी माझे सत्याचे प्रयोग, हिन्द स्वराज्य या ग्रंथातून आणि यंग इंडिया , हरीजन या वृत्तपत्राद्वारे आणि आपल्या भाषणाद्वारे आपले विचार मांडले. म. गांधीजींच्या विचारात अहिंसा, सहिष्णुता, सहकार्य, सद्भावना या मूल्यांना महत्वाचे स्थान आहे. त्यांनी आपल्या विचार आणि कार्याच्या माध्यमातून समाजाला नव दिशा देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे महत्वाचे विचार पुढीलप्रमाणे आहेत.

**१) सत्याग्रह आणि अहिंसा -**

म.गांधीच्या विचारातील व जीवनातील महत्वाचा विचार म्हणजे सत्याग्रह. सत्याग्रह म्हणजे न्यायासाठी संघर्ष होय. सत्याग्रहांमध्ये दुसऱ्याचे हृदय परिवर्तन करणे. सत्याग्रहाच्या माध्यमातून बलाढय, ब्रिटीश शक्ती विरोधात निःशस्त्र प्रतिकाराचा मार्ग स्वीकारून स्वातंत्र्यप्राप्ती केली. सत्याग्रहामध्ये अंहिसा या तत्वांना प्राधान्य देऊन सत्याग्रह हा अंहिसेच्या माध्यमातूनच केला पाहिजे असे त्यांचे स्पष्ट मत होते. अंहिसेंच्या जोरावर जगातील कोणत्याही दृष्ट व हीन प्रवृतीवर मात करता येईल. शक्ती व बळाचा वापर न करता प्रेमाने शत्रुचे मन परिवर्तन करण्याची किमया अंहिसेत आहे. अशी धारणा गांधीची होती या आधारावरच त्यांनी अनेक लढे, आंदोलने यशस्वी केले आणि लोकांचा प्रचंड पाठींबा त्यांना मिळाला. यामुळे ते सत्य आणि अहिंसेचे पुजारी बनले.

**२) स्वावलंबी खेडे -**

महात्मा गांधीचा विचर हा ग्राम विकासाचा केंद्रबिंदू होता. भारतातील ८० टक्के जनता ही खेडयात राहते त्यामुळे खेडयांचा विकास केल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. म्हणून त्यांनी खेड्याकडे चला हा संदेश दिला. म. गांधीच्या ग्राम स्वराज्य या संकल्पनेचा हा एक महत्वाचा भाग होता. खेड्याच्या विकासासाठी गांधीनी लघुउद्योग, कुटीरउद्योग, चरखा, सुतकताई, स्वदेशी वस्तुचा वापर आणि परकीय वस्तुवर बहिष्कार या गोष्टींना महत्व दिले. यांत्रीकीकरणाला विरोध करून ग्रामोद्योगाद्वारे ग्रामीण विकास घडवला पाहिजे अशी भूमिका त्यांनी मांडली आणि शासनाचा सुध्दा केंद्रबिंदू ग्राम / गाव असला पाहिजे आणि खेडी स्वावलंबी झाली पाहिजे यासाठी ते स्वावलंबी खेडे ही संकल्पना माडंतात आणि स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय व्यवस्था ही याला पुरक निर्माण करावी अशी ठोस भुमिका आपल्या विचाराच्या माध्यमातून गांधीजी घेतात.

**३) अस्पृश्यता निवारण -**

अस्पृश्यता हा हिन्दू समाजाला लागलेला रोग आहे. तो नष्ट झाला पाहिजे. नाहीतर हिन्दू धर्माचा नाश होईल. माणूस जन्माने श्रेष्ठ ठरत नाही तर कर्माने ठरतो व चारित्र्याने ठरतो म्हणून समाजात उच नीच भेदभाव मानू नये. यामुळे समाजात अस्पृश्यता वाढली आणि अस्पृश्यता पाळल्यामुळे समाजातील माणुसकी नष्ट झाली. एका माणसाने दुसऱ्या माणसाला स्पर्शासही अपात्र ठरवणे हा शुध्द अमानुषपणा आहे. म्हणून भारतातील अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे याकरीता महात्मा गांधीनी अस्पृश्यता निवारण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यांना चांगल्या सन्मानाने राहता यावे, त्यांना शिक्षण देवून उद्योगशिल बनवावे. यामुळे समाज सशक्त बनेल असा विचार म.गांधीजीनी मांडला आणि अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले.

**४) धर्मविषयक विचार -**

म.गांधीजींच्या विचारावर धार्मिक विचारांचा प्रचंड पगडा होता. जीवनात नैतीक आदर्शांचे काटेकोरपणे पालन करणे हा खरा धर्म होय. असा धर्मविषयक विचार म.गांधीचा होता. धर्म आणि राजकारण वेगळे नसावे. ते सोबतच असावे म्हणून महात्मा गांधीनी राजकारणाचे अध्यात्मीकरण केले. परंतु राजकारणात धर्मवेडेपणा येणे हे त्यांना मुळीच मान्य नव्हते. सर्व धर्मात एकता, बंधुता, सहिष्णुता असावी असे त्यांचे स्पष्ट मत होते. धर्म ही प्रत्येकांची खाजगी बाब असावी कुणीही कोणत्याही धर्माचा द्वेष करू नये. राष्ट्र हे धर्म निरपेक्ष असावे असा आग्रही विचार त्यांनी मांडला. धर्मभावनेचा कुणीही गैरफायदा घेऊ नये. असा सर्वधर्म समभाव विचार गांधीनी मांडला.

**५) शिक्षणविषयक विचार -**

महात्मा गांधीनी आपल्या विचारात शिक्षणाला अग्रस्थान दिले. चरित्र संवर्धन करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट्ये असले पाहिजे. शिक्षणाने आपण चारित्र्य संपन्न बनू तेच खरे शिक्षण होय. अशी शैक्षणिक विचारसरणी म.गांधीजींची होती. पुस्तकी शिक्षण नसावे तसेच कारकून पुरविणारे शिक्षण नसावे तर प्रत्यक्ष जीवनाशी संबंध असलेल्या ज्ञान विज्ञानाचे शिक्षण दिले जावे. यातून स्वावलंबी जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारे शिक्षण द्यावे असे त्यांचे स्पष्ट मत होते. शिक्षण हे वयानुसार द्यावे आणि शिक्षणात सत्य, व्यवहारज्ञान, चारित्र्य निर्मिती, मूल्य जोपासना आणि धर्मप्रतिष्ठा यावर भर असावा असे महात्मा गांधी म्हणतात. यामुळे आदर्श नागरीक घडतील अशी त्यांची भूमिका होती.

**६) विश्वस्त कल्पना -**

नैतिकता हा गांधी विचारांचा गाभा होता. गांधींनी नैतिकतेच्या आधारावर अनेक नाविण्यपुर्ण संकल्पना मांडल्या आहेत. त्यातील विश्वस्त ही महत्वपूर्ण संकल्पना आहे. विश्वस्त संकल्पनेच्या माध्यमातून अहिंसात्मक मार्गाने आर्थिक समाज निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. विश्वस्त म्हणजे समाजातील श्रीमंत लोकांनी स्वतःला संपत्तीचे मालक न समजता विश्वस्त समजावे. आपल्या गरजेपुरती इतकी संपत्ती स्वतःजवळ ठेवून उरलेल्या संपत्तीचा वापर समाज हितासाठी करावा. श्रीमंतानी संपत्तीचे मालक न समजता विश्वस्त समजावे. संपत्तीचे समान वाटप करण्यासाठी ही संकल्पना महत्वाची आहे. भांडवलदार वर्गाने खाजगी मालमत्तेचा त्याग करून विश्वस्ताची भूमिका स्वीकारल्यास अहिंसेच्या मार्गाने आर्थिक समाज निर्माण करता येईल. असा एक महत्वाचा समानतेचा विचार गांधीनी मांडला.

**महात्मा गांधीजींच्या विचारांचे महत्व -**

आज २१ व्या शतकात संपूर्ण विश्व दहशतवादाच्या दबावाखाली आहे. जगातील शांतता नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. अशा वेळी महात्मा गांधीचे विचार खऱ्या अर्थाने उपयुक्त आहेत. कारण गांधीचा विचार हा शांती प्रेम व अहिंसा या तत्वावर आधारीत आहे. जागतिक पातळीवरील दहशतवादामुळे शांतता धोक्यात आली अशावेळी गांधीच्या अंहिसा या विचारांचा आधार महत्वाचा वाटतो.

सध्याच्या जागतिकरणाच्या व भांडवली व्यवस्थेत भारतामध्ये अनेक परदेशातील बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मोठ मोठे उद्योग उभे केले आहेत. या कंपन्यासाठी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या जमीनी देण्यात येत आहेत. परीणामी खेडयातील जमीनी कमी होत

लागल्या यामुळे भूमीहीनांची संख्या वाढत आहे व बेरोजगारी वाढली यामुळे लघुउद्योग बंद पडले त्यातून दारिद्य वाढले अशा स्थितीत म.गांधीचा खेडयाकडे चला हा संदेश महत्वाचा वाटतो.

भारतातील बहुसंख्य जनता ही ग्रामीण भागात राहत असते. याला अनुसरून गांधीनी मांडलेली स्वयंपूर्ण खेडयांची संकल्पना ग्रामीण विकासाच्या संदर्भात मौलीक आहे. पण स्वातंत्र्यानंतर या विचारांकडे दुर्लक्ष झाले व शहरीकरण वाढले आणि शहरात अनेक समस्या निर्माण झाल्या. शहरात गुन्हेगारी, बेकारी वाढली व माणसांचे जीवन असह्य झाले. शहरात झोपडपट्ट्या वाढल्या, आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले. तरूण व्यसनाधिनता आणि हिंसक मार्गाकडे वळला म्हणून देशाची शांतता धोक्यात आली यावर उपाय महात्मा गांधीच्या विचारात सापडतो.

शासनास अबकारी कर मिळतो म्हणून दारूबंदी होत नाही. परिणामी ग्रामीण भागात व्यसनाधिनता वाढली. बेरोजगारीमुळे यात लक्षणीय भर पडली. याचा परिणाम ग्रामीण विकासावर होत आहे. महात्मा गांधी हे व्यसनमुक्तीवर भर देत होते. म्हणून समाजाला आज गांधी विचारांची गरज भासत आहे. खेडे स्वयंपूर्ण करून कुटीर उद्योग लघु उद्योगाला चालना देऊन ग्रामीण भागातील बेकारीचे उच्चाटन हे गांधीजीचा खेडयाकडे चला या विचारातूनच शक्य आहे.

म.गांधीनी आपल्या विचारात, ग्रामीण समुदायावर आधारीत लोकशाहीला आदर्श लोकशाही मानले. गांधीच्या विचारांच्या प्रभावामुळे ग्रामसभा आणि ग्रामपंचायतीची स्थापना झाली. सत्तेचे विकेंद्रीकरण झाले यांचे श्रेय गांधीजीनाच जाते. गांधीजींनी ग्राम (खेडे) हाच लोकशाहीचा मुख्य आधार मानला पण आज गावे संपत चालली आहेत. ग्रामीण राजकारणात गुन्हेगारी वाढली. निवडणूक स्वरूप आणि तंत्र बदलले आणि लोकशाही मूल्यांची पायमल्ली करणारी विकृती वाढीस लागली व तसेच भ्रष्टाचार यामुळे समाजात नितीमत्तेचा ऱ्हास झाला व नैतीक अध:पतन घडून येत आहे. या पार्श्वभूमीवर गांधीचे विचार महत्वाचे वाटतात.

भारतीय समाजव्यवस्थेत उच्च - निचता, श्रेष्ठ - कनिष्ठता आजही दिसून येते कधी जाती, धर्माच्या आधारावर तर कधी श्रीमंत - गरीब (संपत्तीच्या) आधारावर समाजात दरी निर्माण होत आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी वाढत आहे. म्हणून गांधीच्या विचारातील विश्वस्त संकल्पना महत्वाची वाटते. श्रीमंताने गरीबासाठी कार्य केले तर समाजातील भेदभाव आपोआपच कमी होईल या करीता गांधी विचार समाजात रूजवणे गरजेचे आहे.

**सारांश -**

म. गांधीनी राजकीय, आर्थिक, सामाजिक विषयावर महत्वाचे विचार मांडले व चिंतन केले. त्यामुळे तत्कालीन समाजात परिवर्तन निर्माण झाले. त्यांचा प्रत्येक विचार हा माणसाला - माणसासोबत जोडणारा होता. म्हणून आजही म. गांधीजीच्या विचाराचा आधार घेऊन अनेक विचारवंत समाजसुधारक कार्य करत आहेत. यातूनच २१ व्या शतकात गांधी विचारांचे महत्व लक्षात येते. हा विचार समाजात रूजविण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे. तरच देशाची प्रगती होईल.

**संदर्भ -**

१) रोडे सोमनाथ - मानवी मूल्यांच्या संदर्भात, महात्मा गांधीचे विचार
२) सारथी अरूण - शोध महात्मा गांधीचा खंड एक
३) कुंभार नागोराव - महात्मा गांधी विचार दर्शन
४) पळशीकर वसंत - हिन्द स्वराज्याचा संदेश
५) लोकराज्य (मासिक) - ऑक्टोंबर २०१९

■■■■■